# पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - 411 018
## कर आकारणी व कर संकलन विभाग

## मालमत्ता कर थकबाकी वसुलीपोटी जप्त करण्यात आलेल्या स्थावर मालमत्तांची लिलावाने विक्री बाबत

# जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीतील मालमत्ता कर बिलाचे थकबाकीपोटी खालील थकबाकीदारांच्या मालमत्ता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाच्या परिशिष्ट 'ड' मधील प्रकरण 8 (कराधान नियम) नियम 42 ते 47 च्या तरतुदींनुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने जप्त केल्या आहेत.

सदर जप्त मालमत्तांवरील मालमत्ता कराची वसुली करण्याकरिता महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील अनुसूची 'ड' मधील प्रकरण 8 (कराधान नियम) नियम 42 ते 47 मधील तरतुदींनुसार या मालमत्तांचा जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्याचा निर्णय घेण्यात आलेला आहे. सदर मालमत्तांचा प्रथम जाहीर लिलाव दिनांकः 28/03/2024 रोजी महापालिका सहाय्यक आयुक्त (करआकारणी व करसंकलन) यांचे कार्यालय, तळमजला, मनपा मुख्य इमारत, पिंपरी - 411018 येथे दुपारी 12:00 ते 3:00 या वेळेत पुकारण्यात येणार असून, कृपया खालील मालमत्ताधारकांनी व इच्छुक खरेदीदार यांनी याची नोंद घ्यावी. लिलाव करण्यात येणाऱ्या मालमत्तांचा तपशील खालीलप्रमाणे -

**लिलावाने विक्री करावयाचे मालमत्तांचा तपशील**

| क्र | मालमत्ता क्रमांक | विभागीय कार्यालय | मालमत्ता धारकाचे नाव | मालमत्तेचा पत्ता | मालमत्ता प्रकार | मालमत्ता क्षेत्रफळ चौ. फु | 01/03/2024 अखेर कराची थकीत रक्कम | मालमत्तेची किमान किंमत |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 1011401993.00 | निगडी | दुगड नंदलाल बन्सीलाल | से.नं.26, प्लॉट नं.113, निगडी प्राधिकरण, पुणे | मिश्र-निवासी 4650 + बिगरनिवासी 1501.07 | 6150 | 7,27,234 | 5,78,12,421 |
| 2 | 1011102592.00 | निगडी | मे.पी टी शिपिंग प्रा. लि. तर्फे सुनील कुमार महाता व आव्हा राणी महातो | स.नं.3/2, इन्सपिरिया मॉल, जुना मुंबई पुणे रोड,ति /शॉप .म. .ऑफिस नं306 अ, 306 ब, निगडी पुणे 44 | बिगरनिवासी | 1105 | 6,93,925 | 1,20,77,208 |
| 3 | 1011102572.00 | निगडी | राकेश फुलचंद सोनिगरा | स.नं.3/2, इन्सपिरिया मॉल, जुना मुंबई पुणे रोड, प.ऑफिस नं .म.116, निगडी पुणे 44 | बिगरनिवासी | 1119 | 10,21,287 | 1,23,09,280 |
| 4 | 1170502488.00 | वाकड | मे. ईशा प्रॉपर्टीज युनीट क्र.2 | स नं.89/2/11, ईशा प्रॉपर्टीज युनीट नं.2 गाळा क्र.108, ताथवडे 33 | बिगरनिवासी प .म .606 + पार्किंग 100 | 706 | 3,08,916 | 58,97,447 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 5 | 1170502473.00 | वाकड | मे. ईशा प्रॉपर्टीज युनीट क्र.2 भोग. जयश्री प्रदीप खिंवसरा | स नं.89/2/11, ईशा प्रॉपर्टीज युनीट नं.2 गाळा क्र.101, ताथवडे 33 | बिगरनिवासी प.म . 298 + पार्किंग 100 | 398 | 56,119 | 24,13,476 |
| 6 | 1170502493.00 | वाकड | मे. ईशा प्रॉपर्टीज युनीट क्र.2 | स नं.89/2/11, ईशा प्रॉपर्टीज युनीट नं.2 गाळा क्र.201, ताथवडे 33 | बिगरनिवासी दु .म. 298 + पार्किंग 100 | 398 | 1,49,114 | 29,00,064 |
| 7 | 1050805478.00 | सांगवी | निलिमा सुभाष हुल्याळकर व सुभाष परगोंडा हुल्याळकर | फ्लॅट नं .101, पहिला मजला, ए विंग, वॉटर फज, स .नं.18/1/1, 18/2/1/1, 18/2/1/8, 18/2/1/9, पिंपळे निलख 27. | निवासी प.म.2125 + तळ पार्किंग 269 | 2394 | 8,17,800 | 1,73,19,000 |
| 8 | 1050700886.00 | सांगवी | शेख अन्वर हुसेन व शेख सायरा अन्वर | फ्लॅट नं .38 बाबुराव ढोरे भवन बी विंग सांगवी गावठाण, पुणे | निवासी | 650 | 3,79,812 | 42,25,000 |
| 9 | 1110501728.00 | चऱ्होली | एक्सपॅट प्रॉपर्टीज इ . लिमिटेड | स .नं .123/1/2 व 123/1/3, जेनेसीस बिल्डिंग नं/अ-2,फ्लॅट नं-.1103, वडमुखवाडी,चऱ्होली बृ, पुणे -412105 | निवासी | 1547 | 1,68,531 | 86,61,360 |
| 10 | 1110503020.00 | चऱ्होली | व्हॅलरी मेनिनो सोरेस | स .नं .123/1/2, 123/1/3, 3 रा मजला फ़्लॅट क्र-ए .4, 304, जेनेसिस एक्सपॅट इंडीया लि., वडमुखवाडी, चऱ्होली बु. | निवासी ति.म.1101 + पार्किंग 129 | 1230 | 1,41,626 | 69,93,120 |
| 11 | 1110503048.00 | चऱ्होली | अँन्थोनी फ़र्नांडीस | स .नं .123/1/2, 123/1/3, 8 वा मजला फ़्लॅट क्र-ए .4, 802, जेनेसिस एक्सपॅट इंडीया लि., वडमुखवाडी, चऱ्होली बु. | निवासी आठवा म.927 + पार्किंग 129 | 1056 | 1,19,901 | 59,21,400 |
| 12 | 1110503065.00 | चऱ्होली | क्लॉडीना जोनिटा फर्नांडीस, फेबियानो संताना फर्नांडीस | स .नं .123/1/2, 123/1/3, 11 वा मजला फ़्लॅट क्र-ए .4, 1101, जेनेसिस एक्सपॅट इंडीया लि., वडमुखवाडी, चऱ्होली बु. | निवासी अकरावा म.1102 + पार्किंग 129 | 1231 | 1,41,757 | 59,29,000 |

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 13 | 1070101636.00 | पिंपरी नगर | मे. जय किशन पांचरिया तर्फे जय कन्स्ट्रकशन भो. श्रीमती गीता व श्री सुनील आत्मानी | जय प्लाझा, एच बी 13/8, तिसरा मजला ऑफिस क्र .11, 12,13 पिंपरी | बिगरनिवासी शॉप 10 दु . .म 240 + शॉप 11,12,13 ति. म . 300+240+ 240 | 1020 | 13,57,013 | 89,68,000 |

अटी-शर्ती :

1) सदरील लिलावप्रक्रीयेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असणाऱ्या बोलीदाराने **करसंकलन विभाग, मुख्य कार्यालय** येथे दि. 27/03/2024 रोजी दुपारी 3:00 वाजेपर्यंत आधारकार्ड, पॅन कार्ड, यांचे प्रतीसह लेखी अर्जाद्वारे नोंदणी करावी.
2) जशी आहे तशी मालमत्ता हस्तांतरीत करण्यात येईल.
3) मालमत्तांची किमान लिलाव किंमत कोणत्याही परिस्थितीत सरकारी मुल्यांकनकर्ता यांचेकडूनप्राप्त झालेल्या मुल्यांकनापेक्षा कमी असणार नाही.
4) लिलाव प्रक्रीयेमध्ये सहभागी होण्यासाठी इच्छुक असणाऱ्या उमेदवाराने उपरोक्त नमूद ज्या ज्या मालमत्ताकरिता बोली लावायची असेल त्या प्रत्येक मालमत्ताकरिता स्वतंत्रपणे मालमत्तेच्या किमान मूल्यांकन रकमेच्या 1% बयाना रक्कम महापालिकेकडे डीडी स्वरुपात कार्यालयीन वेळेत दि. 27/03/2024 रोजी संध्याकाळी 4:00 पर्यंत जमा करावी लागेल. त्याची पावती दाखवल्याशिवाय लिलावात सहभागी होता येणार नाही.
5) सदरील डीडी COMMISSIONER, PCMC यांचे नावे काढावा. तो पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मुख्य कर्यालयात - लेखा विभागात भरणे आवश्यक असून त्याकामी कर आकारणी व कर संकलन कार्यालयाकडून चलन घेणे आवश्यक आहे. लेखा विभागात चलन भरलेनंतर इच्छुक बोलीधारकास PANCARD, ADHAR CARD च्या साक्षांकित छायांकित प्रत यासह चलनाची मूळ प्रत करआकारणी व करसंकलन कार्यालय, महानगरपालिका मुख्य इमारत, पिंपरी यांचेकडे सादर करावी लागेल.
6) लिलावप्रक्रियेपूर्वी मालमत्ताधारकाने संपूर्ण थकीत कराची रक्कम तद्अनुषंगिक लिलाव प्रक्रियेच्या खर्चासह महापालिकेकडे जमा केल्यास अशी मालमत्ता सदरील लिलाव प्रक्रीयेमधून वगळण्यात येईल.
7) मालमत्ता विक्रीच्या वेळी लिलाव घेणाऱ्या (यशस्वी) बोलीदारास खरेदीच्या किंमतीपैकी 20 टक्के रोख रक्कम लिलाव करणाऱ्या अधिकाऱ्याकडे अनामत म्हणून तात्काळ भरली पाहीजे. अन्यथा ही मालमत्ता ताबडतोब परत विक्रीसाठी काढण्यात येउन तिची विक्री केली जाईल आणि पूर्वीच्या खरेदीदारास पुन्हा लिलावात भाग घेता येणार नाही.
8) लिलाव घेतल्याचे दिनांकापासून 20 दिवस मूळ मालमत्ताधारकास मुदत देण्यात येईल. सदरील मुदतीत मूळ मालमत्ता धारकाने लिलाव प्रक्रिया खर्चा सहित संपूर्ण रक्कम महापालिकेकडे जमा केल्यास लिलाव घेणाऱ्या बोलीदारास त्याने महापालिकेकडे उपरोक्तनुसार जमा केलेली रक्कम परत करण्यात येईल व अशा मालमत्ताधारकाचे नाव (मालमत्ता) सदरील लिलाव प्रक्रियेतून वगळण्यात येईल.
9) मूळ मालमत्ता धारकाने थकीत कराची रक्कम उपरोक्त मुदतीत न भरल्यास लिलाव घेणाऱ्या बोलीदारास बोली रकमेतील उर्वरित (80%) रक्कम पिंपरी चिंचवड महापालिकेस लिलावाचे नंतरची 20 दिवसांची मुदत संपल्यानंतर 7 दिवसांचे आत अथवा 7 वा दिवस साप्ताहिक किंवा सार्वजनिक सुट्टीचा असेल तर त्या नंतरच्या लगतच्या कामाच्या दिवशी महापालिकेच्या कार्यालयात भरावी लागेल.
10) उपरोक्त नमूद केलेल्या कालावधीमध्ये खरेदीची उर्वरित रक्कम (80%) जमा करण्यास खरेदीदाराने कसूर केल्यास त्यांनी लिलावाची वेळी जमा केलेल्या 20% अनामत रकमेतून विक्रीसाठी झालेला खर्च वसूल करण्यात येईल, आणि उर्वरित रक्कम महापालिकेच्या निधीत जमा करण्यात येईल. त्यानंतर सदर

मालमत्तेची पुनर्विक्री करण्यात येईल. कसूरदार असलेल्या खरेदीदाराचा मालमत्तेवर अथवा मालमत्तेची विक्री करून मिळालेल्या रकमेच्या कोणत्याही भागावर हक्क राहणार नाही.

11) लिलाव घेणाऱ्या बोलीदाराने संपूर्ण बोली रक्कम महापालिकेकडे भरल्यानंतर सदरील खरेदी विक्रीचा दाखला महापालिका आयुक्त यांचेकडून देण्यात येईल. त्यानंतर निबंधक कार्यालयाकडे नोंदणीची तसेच मालमत्ता कराच्या बोलीवरील नाव हस्तांतरणाची प्रक्रिया बोलीधारकाने स्वखर्चाने पूर्ण करावयाची आहे.

12) लिलावाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर मूळ मालमत्ताधारकाचा सदरील मालमत्तावर कोणताही हक्क, हितसंबंध राहणार नाही.

13) सदरील लिलावातील मालमत्ताबाबत कोणत्याही व्यक्ती, संस्था व इतर यांचे आर्थिक हितसंबंध, हरकती असल्यास योग्य त्या कागदपत्रांसह सहाय्यक आयुक्त (करआकारणी व करसंकलन) कार्यालय, पिंपरी चिंचवड महानगरपालिका, मुख्य प्रशासकीय इमारत, पिंपरी-411018 यांचेकडे दि.22/03/2024 पूर्वी लेखी स्वरूपात नोंदवाव्यात. लिलावाचे दिनांकानंतर कोणतीही हरकत / म्हणणे विचारात घेतले जाणार नाही.

14) उपरोक्त लिलाव प्रक्रिया राबविणे, पुढे ढकलणे अथवा थांबविणे, लिलाव स्वीकारणे अथवा नाकारणे इ. सर्व अधिकार मा. अति. आयुक्त (1), पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत.

मालमत्ता निरिक्षणासाठी तसेच कागदपत्रे व विक्रीच्या अटी/शर्ती च्या प्रतींसाठी संबंधित विभागीय कार्यालय व मुख्य कार्यालय, कर आकारणी व कर संकलन विभाग येथे तजवीज ठेवण्यात आली आहे. कृपया इच्छुक बोली लावणाऱ्यांनी कार्यालयाकडुन सर्व बाबींची खात्री करुन घ्यावी.

सही/-
अति. आयुक्त (1)
तथा
अध्यक्ष, जप्त मालमत्तेची लिलाव समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जा क्र : कर/मुख्य/17/कावि/25 /2024

दिनांक :06/03/2024